Kasegaon Education Society's,
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar.
Central Library

वाचन संकल्प महाराष्ट्राचा
२०२४-२०२५
अंतर्गत



ग्रंथालय सहल (लायब्ररी टूर)

Organized by
RIT CENTRAL LIBRARY

अहवाल

दिनांक: ०३ जानेवारी २०२५
ठिकाण: मध्यवर्ती ग्रंथालय
लाभार्थी : परिसरातील सर्व शालेय विद्यार्थी
समन्वक: सौ.एस.एन. केखलेकर
श्री. मंगेश डांगे

प्रस्तावना

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रम अंतर्गत वाचकवर्गामध्ये वाचन संस्कृती संवर्धन होणेकरीता दि ०१ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये सामूहिक ग्रंथ वाचन,ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथालय सहल (लायब्ररी टूर), नवसाहित्याची ओळख असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

उपक्रमाबद्दल

ग्रंथालय सहल (लायब्ररी टूर) या उपक्रमामध्ये महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये असणारे विविध विभागांची परिसरातील माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळेमधील मुलांना ओळख करून देण्यात आली. महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालयाचे चालणारे दैनंदिन कामकाजाची, वाचकांना देण्यात येत असलेल्या सेवा यांची माहिती मुलांना देण्यात आली. सदर मुलांना महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालयात असणारे स्पर्धापरीक्षा, मराठी, हिंदी, इंग्लिश भाषांमधील प्रसिद्ध कथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह, शोधनिबंध, ज्ञानकोश अशा विविध गोष्टीची माहिती या उपक्रमाअंतर्गत देण्यात आली.

उपक्रमाचे उद्दीष्ट्ये

- परिसरातील वाचकांना उपलब्ध साहित्याचीओळख करून देणे.
- वाचन संस्कृती, वाचन कौशल्य वृद्धिंगत करणे
- ग्रंथालयातील नवसंकल्पनांची माहिती करून देणे

सारांश

वाचन संस्कृती वाचन कौशल्य वृद्धिंगत होण्यासाठी राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालयामार्फत महाराष्ट्र शासन निर्देशानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे आयोजन केले. सदर कार्यक्रमास परिसरातील माध्यमिक शाळा ,उच्च माध्यमिक शाळेमधील विध्यार्थ्यानी भेट देऊन आयोजित उपक्रमांचा लाभ घेतला. सदर उपक्रमास कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव प्रा आर. डी. सावंत सर ,महाविद्यालयाचे संचालक डॉ. कडोले पी. व्ही. सर , रजिस्ट्रार सौ. सारिका पाटील मॅडम आणि सर्व डीन , विभागप्रमुख यांनी कौतुक केले सदर उपक्रमास ग्रंथपाल प्रा. विश्वास हासे यांचे मार्गदर्शन लाभले व ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी उपक्रमाचे आयोजन केले.

समन्वयक	ग्रंथपाल	संचालक
सौ. स्वाती केखलेकर	प्रा. व्ही. एल. हासे.	प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले.
श्री. मंगेश डांगे		

Rajarambapu Institute of Technology
CENTRAL LIBRARY

छायाचित्रे



Rajarambapu Institute of Technology • K.E.S.
CENTRAL LIBRARY